सकाळ TODAY

कोल्हापूर, बुधवार, ११ जून २०२५

12/06/2025




कोल्हापूर : नवी दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत ऋषिकेश कबनूरकरला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश कबनूरकरचे यश

कोल्हापूर, ता. १० : नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर बुद्धिबळ फिडे रेटिंग २००० खालील 'बी' गटातील स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकरने तिसरा क्रमांक पटकाविला, तर क्रमवारीत दुसरा क्रमांक मिळवला.

दिल्ली बुद्धिबळ असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या स्पर्धेत ऋषिकेशने १० फेरीत ८ गुण मिळवून संयुक्त तिसरा क्रमांक मिळवला. या स्पर्धेत देशभरातून ८८८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यात आंतरराष्ट्रीय मानांकित ७३१ खेळाडू होते. या स्पर्धेत मुलींमध्ये ऋषिकेशची बहीण [illegible] हिने पाच गुणांची कमाई केली. स्पर्धेत एकूण ३० लाखांची बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धा ग्रँडमास्टर एक २००० रेटिंगखालील व 'बी' गटवारी आणि १७०० मानांकन गटवारी अशा तीन गटात खेळविण्यात आली. ऋषिकेश विवेकानंद कॉलेजचा विद्यार्थी असून, त्याला प्रशिक्षक कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद ■ बुधवार, ११ जून २०२५

12/06/2025

# इंटरनॅशनल ओपन चेसमध्ये कोल्हापूरचा ऋषिकेश दहावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या २१ वी दिल्ली इंटरनॅशनल ओपन ग्रँडमास्टर बी-कॅटेगरी चेस टुर्नामेंटमध्ये कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकरने दर्जेदार कामगिरी केली. त्याने स्पर्धेच्या १० फेरीत ८ गुणांची कमाई करत १० वा क्रमांक मिळवला. तसेच त्याला स्पर्धेत संयुक्तपणे तिसरा क्रमांकही मिळाला आहे. या यशासाठी त्याने ८ सामने जिंकण्याची कौतुकास्पद कामगिरी केली. दिल्ली बुद्धिबळ असोसिएशनच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

देशभरातील काही हजाराच्या घरात बुद्धिबळपटूंचा सहभाग असलेली ही स्पर्धा ए. बी. आणि सी अशा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. यापैकी बी कॅटेगरीमधून ऋषिकेशने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. याच बी कॅटेगरीमधून देशभरातून ८५८ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. या सर्वांचे रेटिंग १९०० खालील होते. दरम्यान, स्पर्धेत ८५८ बुद्धिबळपटूंच्या तुलनेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तेलंगणा येथील सार्थक अद्वतलाने विजेतपद मिळवले. त्याला बक्षीस वितरण समारंभात ४ लाख रुपये व चषक असे बक्षीस देऊन गौरवले. दुसरा क्रमांक मिळवलेल्या सुंदरम कुमार (दिल्ली) याला ३ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन सन्मानित केले. तसेच चेक तोहिलने तिसरा क्रमांक पटकावला. त्याला २ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन गौरवले. याचबरोबर १० वा क्रमांक पटकावलेल्या कोल्हापूरच्या ऋषिकेशला ६० हजार रुपये, चषक देऊन गौरवले. ऋषिकेशची सख्खी बहीण शर्वरी कबनूरकरनेही बी-कॅटेगरीतूनच बुद्धिबळ स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते. तीनेही चांगला खेळ करत ५ गुणांची कमाई केली. ऋषिकेश हा विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर कुंभार, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



■ टुर्नामेंटच्या बी कॅटेगरीत कामगिरी

तरुण भारत संवाद

सोमवार, २३ जून २०२५

# आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त शहरात योगाभ्यास




## 'योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, ताणतणाव कमी होतो'

कोल्हापूर

शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे. योगाचे महत्व अनमोल आहे. योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, तणाव कमी होतो, एकाग्रता आणि आंतरिक शांतता लाभते. योगामुळे आपणास सुदृढ शरीरासोबत परिपक्व मनाची निर्मिती करता येते. असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार यांनी व्यक्त केले. योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

विवेकानंदमधील कार्यक्रमात डॉ. राजश्री पाटील, योग प्रशिक्षक, आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी देविका माने, शिवदिप वेदपाठक, अभिजीत यांनी योग प्रात्यक्षिके घेतली. डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, एन.सी.सी. प्रमुख मेजर सुनिता भोसले, एन.एसएस विभागाचे डॉ.संदीप पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स् बटालियनचे कर्नल संपान मिश्रा यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक आणि स्वागत जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव यांनी केले. प्रा सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. सुत्रसंचालन सायली वडकर यांनी केले.

23/6/25

23.6.25

पुढारी MY कोल्हापूर

रविवार, २२ जून २०२५



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिन (२१ जून) सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमीत्ताने शाळा-महाविद्यालयांसह विविध संस्था-संघटना, तालीम मंडळांच्या वतीने शनिवारी दिवसभर आरोग्यदायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**विवेकानंद महाविद्यालय**

आंतरराष्ट्रीय योग दिन विवेकानंद महाविद्यालयात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व सांगितले. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम डॉ. राजश्री पाटील, योग प्रशिक्षिका आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी देविका माने, शिवदीप वेदपाठक, अभिजित यांनी योग, यम, नियम धारणा, प्रत्याहार याचे विवेचन निरनिराळ्या योग आसनांच्याद्वारे कृती आधारित योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कार्यक्रमाचे आयोजन आय.क्यू.ए.सी. डॉ. श्रुती जोशी, डॉ. विकास जाधव, मेजर सुनीता भोसले, डॉ. संदीप पाटील यांच्यामार्फत करण्यात आले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

रविवार, २२ जून २०२५

# निरोगी शरीर, मनासाठी योग आवश्यक : प्राचार्य कुंभार

## विवेकानंद कॉलेजमध्ये योग दिन उत्साहात

**कोल्हापूर :** शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

योग प्रशिक्षिका डॉ. राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. देविका माने, शिवदीप वेदपाठक, अभिजित यांनी कृती आधारित योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्रुती जोशी, जीमखानाप्रमुख डॉ. विकास जाधव, एनसीसीप्रमुख मेजर सुनीता भोसले, एनएसएस विभागाचे डॉ. संदीप पाटील यांनी केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक डॉ. विकास जाधव यांनी केले. आभार प्रा. सुप्रिया पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन एनसीसी कॅडेट सायली वडकर यांनी केले. रजिस्टार एस. के. धनवडे यांचे सहकार्य लाभले.

23/6/25

23.6.25

# विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये शनिवारी ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा झाला. शरीर व मन निरोगी राहण्यासाठी सर्वांनी नियमितपणे योगा करणे आवश्यक आहे. योग आपल्या शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक स्तरावर संतुलित आणि निरोगी जीवनशैली जगण्यास मदत करतो. योगामुळे आपणास सुदृढ शरीरासोबत परिपक्व मनाची निर्मिती करता येते, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी यावेळी मांडले.



विवेकानंद कॉलेजमध्ये २१ जून या ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम आर्ट ऑफ लिव्हिंगच्या योग शिक्षिका डॉ. राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन आयक्यूएसी डॉ. श्रुती जोशी, जिमखाना प्रमुख डॉ. विकास जाधव, एनसीसी प्रमुख मेजर सुनिता भोसले, एनएसएस विभागाचे डॉ. संदीप पाटील यांच्यामार्फत करण्यात आले. या कार्यक्रमास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, ६ महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियनचे कर्नल संधान मिश्रा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

सूत्रसंचालन एनसीसी कॅडेट सावली वडकर यांनी केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. सौ. शिल्पा भोसले, प्रा. अशोक पाटील, प्रा. एम. आर. नवले, प्रा. बी. एस. कोळी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पवार, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, एनसीसी कॅडेट्स, एनएसएस स्वयंसेवक, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रजिस्टार एस. के. धनवडे व प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत शनिवार, २६ जुलै २०२५

# बेंगळुरूतील बुद्धिबळ स्पर्धेत
# ऋषिकेशची शानदार कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

बेंगळुरू येथे झालेल्या सेकंड ट्रिपल क्राउन चेस–२०२५ टुर्नामेंटमध्ये कोल्हापूरच्या ऋषिकेश शशिकांत कबनूरकर याने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत चौथा क्रमांक मिळवला.

बुद्धिबळपटूंनी ६ अथवा ८ मिनिटात स्पर्धेतील आपली एक फेरी संपवणे असे स्पर्धेचे स्वरुप होते. अशा स्वरुपात स्पर्धेमध्ये नऊ फेऱ्या झाल्या. यात ऋषिकेशनने ९ पैकी साडे सात गुणांसह बकोल्झ गुण मिळवण्याची किमया करत चौथे स्थान मिळवले. हे स्थान मिळताना ऋषिकेशने आपल्या नवव्या फेरीत गोवा चॅम्पियन, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मंदार लाड याला हरवण्याचा पराक्रम केला.

स्पर्धेतील या एकुणच कामगिरीमुळे



ऋषिकेशच्या फिडे आंतरराष्ट्रीय गुणांकनामध्ये १६० गुणांची भर पडली आहे. त्यामुळे त्याचे फिडे आंतरराष्ट्रीय गुणांकन आता १८८० होणार आहे.

सध्या तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत आहे. त्याला संस्थेचे प्राचार्य कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडल, बुद्धिबळ प्रशिक्षक कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

- सेकंड ट्रिपल क्राऊन चेसमध्ये पटकावला चौथा क्रमांक
- रॅपिड चेस टुर्नामेंटमध्ये ३० व्या स्थानावर
- दोन्ही स्पर्धेत भारतासह परदेशातील बुद्धिबळपटूंचा सहभाग
- राष्ट्रीय बुद्धिबळपटूंना दिली टक्कर

## ऋषिकेशला रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन गौरवले

बेंगळुरू येथील गोल्डन आरा ट्रस्टच्या वतीने ब्लीट्झ स्वरुप असलेल्या सेकंड ट्रिपल क्राउन चेस–२०२५ टुर्नामिंट, रॅपिड बुद्धिबळ टुर्नामिंटचे आयोजन करण्यात आले होते. सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये २१७ व रॅपिड बुद्धिबळ टुर्नामिंटमध्ये देश–विदेशातील ५६५ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतलेला होता. स्पर्धेतील यशस्वी बुद्धिबळपटूंना एकूण सहा लाख रुपयांच्या पारितोषिकांनी गौरवले. सेकंड ट्रिपल क्राउन चेस व रॅपिड बुद्धिबळ टुर्नामिंटमध्ये ऋषिकेश हा कोल्हापूरतर्फे सहभागी झाला होता. सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये ऋषिकेशने भलेही चौथा क्रमांक मिळवला असला तरी रॅपिड बुद्धिबळ टुर्नामिंटमध्ये त्याला तिसाव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. परंतू तिसावा क्रमांक मिळवतानाही त्याने जिद्दीच्या जोरावर ९ पैकी ७ गुण मिळवण्याची कामगिरी केली आहे. बक्षीस वितरण समारंभात सेकंड ट्रिपल क्राउन चेसमध्ये चौथा क्रमांक मिळवल्याबद्दल ऋषिकेशला ६ हजार रुपये, चषक व प्रमाणपत्र देऊन गौरवले. तसेच रॅपिड बुद्धिबळ टुर्नामिंटमध्ये ३० वा क्रमांक मिळवल्याबद्दल त्याला ३ हजार रुपये, चषक व प्रमाणपत्र असे बक्षीस देऊन गौरवले. ऋषिकेश हा अनुज ॲकॅडमीचा बुद्धिबळपटू आहे.

हॅलो प्रभात

# अनिष सोनटक्केची टेबल टेनिस स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी ; सुवर्णपदकाची कमाई




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सांगली येथे २८ जुलै रोजी पार पडलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय रँकिंग टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील बी.कॉम तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला विद्यार्थी कु. अनिष सतीश सोनटक्के याने चमकदार कामगिरी करत ओपन सिंगल कॅटेगरीत सुवर्णपदक पटकावले. विशेष म्हणजे, राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवणारा तो कोल्हापूर जिल्ह्यातील पहिला खेळाडू ठरला आहे, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. या यशामुळे अनिष सोनटक्के याने कोल्हापूर जिल्ह्याचे नाव संपूर्ण राज्यात उज्वल केले आहे.या यशासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, तसेच सी.ई.ओ. श्री. कौस्तुभ गावडे यांचे अमूल्य प्रोत्साहन आणि पाठबळ मिळाले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ.विकास जाधव, प्रा.संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, तसेच रजिस्ट्रार श्री. एस. के. धनवडे व श्री. सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन आणि पाठबळही अनिषला लाभले. महाविद्यालय, संस्था आणि सर्व शिक्षकवर्गाकडून अनिषच्या या ऐतिहासिक यशाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे

तरुण भारत
शनिवार, २ ऑगस्ट २०२५

# सांगली येथील टेबल टेनिस स्पर्धेत अनिश सोनटक्केची सुवर्ण कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

सांगली येथे घेण्यात आलेल्या दुसरी स्टेट रँकिंग टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयातील बीकॉम भाग तीनचा विद्यार्थी अनिष सोनटक्के याने ओपन सिंगल टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळवले. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आजपर्यंतचा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

राज्य स्तरावर टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सुवर्ण पदकाची कमाई करणारा एकमेव खेळाडू आहे. त्याला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले, वडील सतीश सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.




कोल्हापूर : राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक स्विकारताना खेळाडू अनिश सोनटक्के.

2.8.25

पुढारी

रविवार, १७ ऑगस्ट २०२५/ ३

**विवेकानंद कॉलेज**

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी परेड संचलन सादर केले. संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य धनराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानिमित्ताने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित केलेल्या समारंभात विवेकानंद कॉलेजमधील सेवानिवृत्त कर्मचारी, पुस्तक लेखक, नेट, सेट, पीएच. डी. पदवी प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्टाफ सेक्रेटरी डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन जिमखाना प्रमुख प्रा. डॉ. विकास जाधव, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. संतोष कुंडले, प्रा. एस. पी. थोरात, डॉ. ई. बी. आळवेकर यांनी केले.

**शाहू छत्रपती शिक्षण संस्था**

संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांच्या उपस्थितीत व माजी नगरसेवक इंद्रजीत बोंद्रे यांच्या

हॅलो प्रभात

# शिक्षकांनीच विद्यार्थ्यांचा मायबाप व्हावे : प्रा.अभयकुमार साळुंखे

## विवेकानंद कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

आजच्या विभक्त कुटुंब व्यवस्थेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मायबाप होऊन त्यांचे सर्वांगीण घडवणे आवश्यक आहे. युवकांनी राष्ट्रऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथावर न्यावे, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले.विवेकानंद कॉलेजमध्ये त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी एनसीसी विद्यार्थ्यांनी शानदार परेड सादर केली.



कार्यक्रमाला सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार, प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य धनराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानिमित्ताने डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे सेवानिवृत्त कर्मचारी, लेखक व नेट-सेट, पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार झाला. विद्यार्थिनी प्राजक्ता गायकवाड हिला वैद्यकीय उपचारासाठी रु. ११,०००/- चा धनादेश प्रदान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. आर.आर. कुंभार यांनी, आभार डॉ. कविता तिवडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.